राज्य शासनाच्या सेवेतील गट-क व गट-ड कर्मचा-यांच्या शिस्तभंगविषयक कार्यवाही-बाबतचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाला संदर्भित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-सीडीआर-१०९९/प्र.क्र.१०/९९/अकरा,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- १४ सप्टेंबर, १९९९.

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०७५/१०,दि.२४ जुलै,१९७५.

## परिपत्रक

सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०७५/१०,दिनांक २४ जुलै ७५ सोबतच्या प्रपत्र ड मध्ये अनुक्रमांक ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अराजपत्रित कर्मचा-यांविरुध्दची शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची प्रकरणे सा.प्र.वि.ला संदर्भित करु नये, असे सूचित केले आहे. आता शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा दर्जा गटनिहाय नमूद केल्यामुळे यापुढे गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांची शिस्तभंगविषयक कार्यवाहीची प्रकरणे सा.प्र.वि.ला संदर्भित करण्याची आवश्यकता नाही. अशा कर्मचा-यांच्या प्रकरणांबाबत विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांच्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज. ना. कुलकर्णी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव / उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव व प्रधान सचिव,
सर्व सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती.